**माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मागविणाऱ्या अर्जदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांचे वेगळी नोंदवही ठेवण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१६ /प्र.क्र.(१४०/१६) सहा.**
मंत्रालय, मुंबई -४००० ३२.
दिनांक- ७.९.२०१६.

**परिपत्रक:-**

माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मागविणाऱ्या अर्जदारांना वेगवेगळया सार्वजनिक प्राधिकरणांकडून वेगवेगळया नमुन्यात माहिती उपलब्ध करून देण्यात येते. तथापि, माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मागविणाऱ्या अर्जदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांची वेगळी नोंदवही (Register) ठेवण्यात येत नसल्याचा मुद्दा उपस्थित करून माहिती अधिकारात प्राप्त होणाऱ्या अर्जांवर करण्यात येत असलेली कार्यवाही सुस्पष्ट असण्याच्या दृष्टीने आवश्यक बाबी सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणण्याची व या अनुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सूचित करीत आहे.

२. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मागविणाऱ्या अर्जदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांची वेगळी नोंदवही (Register) रजिस्टर ठेवण्यात यावी. सदर नोंदवहीत सर्वसाधारणपणे खालील बाबी समाविष्ट असाव्यात.

विभागाचे नाव: वर्ष:

सार्वजनिक प्राधिकरणाचे नाव: पदनाम:

जन माहिती अधिकाऱ्याचे नाव:

| अ.क्र. | अर्जाचा नोंदणी क्रमांक | अर्जदाराचे नाव व पत्ता | कोणा कडे अर्ज केला आहे? मा.अ. /स.मा .अ | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती पुरविण्याची शेवटची तारीख | अर्जदार दारिद्र रेषेखालील आहे काय | माहितीचा थोडक्यात तपशील | मागीतलेल्या माहितीचे स्वरूप (फॉर्म), प्रती मागणे/तपासणी/ नमुना/इलेक्ट्रॉनिक माहिती | त्रयस्थ पक्षाची माहिती आहे काय? | अर्जा चे शुल्क रूपये | अर्जाची विहित फी भरल्याचा दिमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. |
| | | | | | | | | | | | |
| माहिती शुल्क कळविल्याचा दिनांक | माहिती शुल्क भरण्याचे स्वरूप व दिनांक | माहितीचे शुल्क further fees | माहिती शुल्क दिल्या पासून माहिती देण्यासाठी शिल्लक दिवस. | माहिती दिल्याचा दिनांक | माहिती कशाने पाठविली की व्यक्ती शः नेली . | माहिती कोणत्या स्वरूपात दिली. | पृथक्करणीय माहिती त्रयस्थ पक्षाची माहिती आहे का ? | माहिती नाकारली काय? | कोणत्या कलमाच्या आधारे नाकारली? | प्रथम अपोल झाले आहे का? | शेरा. |
| १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. | २०. | २१. | २२. | २३. | २४. |

Scanned with ACE Scanner

प-५



३. प्रत्येक महिन्याच्या शेवटी, त्या महिन्यात आलेल्या माहिती अर्जांचा सारांश घेण्यात यावा. सदर सारांशामध्ये सर्वसाधारणपणे खालील बाबी समाविष्ट असाव्यात.

| आधीच्या महिन्यातील प्रलंबीत असलेल्या माहिती अर्जांची संख्या | त्या महिन्यात प्राप्त झालेल्या माहिती अर्जांची संख्या | एकूण | त्या महिन्यात निकाली काढलेल्या माहिती अर्जांची संख्या | प्रलंबीत असलेल्या माहिती अर्जांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |

४. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अर्जदारांकडून प्राप्त होणाऱ्या प्रथम अपील अर्जांची वेगळी नोंदवही (Register) प्रथम अपील अधिकाऱ्याकडेही ठेवण्यात यावी. सदर नोंदवहीत सर्वसाधारणपणे खालील बाबी समाविष्ट असाव्यात.

वर्ष: विभागाचे नाव:

सार्वजनिक प्राधिकरणाचे नाव: पदनाम:

अपीलीय अधिकाऱ्याचे नाव:

| अ.क्र. | अपील अर्जाचा नोंदणी क्रमांक | अपील काराचे नाव व पत्ता | अपील अर्ज कोणाकडे केला आहे? स.मा.अ/ अपील प्राधिकारी | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | प्रतिवादी याचे नाव व पत्ता. | अपीलार्थी दारिद्र रेषेखालील आहे काय | अपीलाचा थोडक्यात तपशील | अपील अर्जाचे शुल्क कोणत्या स्वरूपात भरले. | अपील अर्जाचे विहित शुल्क भरल्याचा दिनांक. | कोणत्या जनमाहिती अधिकाऱ्याविरूध्द अपील केले त्याचा तपशील. | अपीला वर निर्णय दिल्याचा दिनांक | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. |

५. प्रथम अपील अधिकाऱ्याने प्रत्येक महिन्याच्या शेवटी, त्या महिन्यात आलेल्या प्रथम अपील अर्जांचा सारांश घ्यावा. सदर सारांशामध्ये सर्वसाधारणपणे खालील बाबी समाविष्ट असाव्यात.

| आधीच्या महिन्यातील प्रलंबीत असलेल्या अपील अर्जांची संख्या | त्या महिन्यात प्राप्त झालेल्या अपील अर्जांची संख्या | एकूण | त्या महिन्यात निकाली काढलेल्या अपील अर्जांची संख्या | प्रलंबीत असलेल्या अपील अर्जांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |

६. उपरोक्त परिपत्रकातील तरतूदी सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनीक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.



Scanned with ACE Scanner

७ सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्र. २०१६०९०७१४०२००१५०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Rajendra M Jadhav

Digitally signed by Rajendra M Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=656ebca17998fd5c29178a5abcf1aa60d72bd5515ddc791d9ad9786418f07e4f, cn=Rajendra M Jadhav
Date: 2016.09.07 14:12:28 +05'30'

(रा.मा.जाधव)
शासनाचे उप सचिव.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

सामान्य प्रशासन विभाग

**परिपत्रक**

क्र. एमओएम/६४ दि. ११.०४.२०२५

विषय:-माहिती अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत माहिती मागविणा-या अर्जदारांकडून प्राप्त होणा-या अर्जांची वेगळी नोंदवही ठेवण्याबाबत.

संदर्भ:-परिपत्रक क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.(१४०/१६)सहा. दि.०७.०९.२०१६

शासनाचे उप सचिव,सामान्य प्रशासन विभाग,महाराष्ट्र शासन यांचे संदर्भाधीन सोबत जोडलेले परिपत्रक कृपया पहावे.

त्याअनुषंगाने सर्व खाते/विभाग प्रमुख यांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व उपविभागातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना सदर परिपत्रकांतील निदेशांनुसार कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/-२६.०३.२०२५ | सही/-२७.०३.२०२५ | सही/-०२.०४.२०२५ | सही/-०६.०४.२०२५ |
| (शारदा गोसावी ) | (किशोर गांधी) | (डॉ.अश्विनी जोशी) | (भूषण गगराणी) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (सा. प्र.) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) | महानगरपालिका आयुक्त |

प्रकअ/१६८
२०२४-२५

सामान्य प्रशासन विभाग
क्र. एमओएम/६४ दि.११.०४.२०२५

प्रत:-------------------------------------------------------------------------------यांना
माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(श्रीम. लीना ता. शिंदे)
रचना व कार्यपध्दती अधिकारी (आयुक्त कार्यालय)

Scanned with ACE Scanner